जा.क्र./OW.No. 1195/पोउआ/प्रकटीकरण /2022
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.
दूरध्वनी क्र. /Tel. No. 2262 1220
दिनांक/Date : 13/10/2022

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई

विषय :– Best Detection of the Month AUGUST– 2022 ''उत्कृष्ट गुन्हे शोध'' व Best Conviction of the Month AUGUST – 2022 ''उत्कृष्ट अपराधसिध्दी'' पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन/बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे ऑगस्ट –२०२२ करीता **'' बेस्ट डिटेक्शन अर्थात ( उत्कृष्ट गुन्हे शोध ) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात ( उत्कृष्ट अपराधसिघ्दी) ''** याकरीताचे खालील नमुद पोलीस ठाणे याची निवड करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ) माहे ऑगस्ट – २०२२ करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ –**

१) गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष–११, गुन्हे शाखा, मुंबई, वि.स्था.गु.नों.क्र. १२६/२००६ कलम ८ (क) सह २१, २९ एन.डी.पी.एस.कायदा १९८५ (स्पेशल केस नं. ९२/२००६)

२) वर्सोवा पोलीस ठाणे, परिमंडळ–०९, मुंबई गु.र.क्र.४५३/२०२२ कलम ३०२ भादवि

**ब) माहे ऑगस्ट – २०२२ करीताचे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ –**

**दहिसर** पोलीस ठाणे, परिमंडळ – १२, गु.र.क्र. ४४२/२०१६ कलम ३७०(अ) (१), ३४ भादवि सह ४,५ पीटा. ॲक्ट १९५६ सह ४,८ सह १७ पोक्सो अधिनियम,

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ) व उत्कृष्ट अपराधसिघ्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

**सही/–**
पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
(अति.कार्य) गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

प्रत:–

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

**मजकुर :—**

दिनांक १३/१०/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“ Best Detection of the Month ’’** माहे ऑगस्ट —२०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ऑगस्ट —२०२२

| | | |
|---|---|---|
| **०१** | **कक्ष—११, गुप्रशा., गुअवि., मुंबई** | **वि.स्था.गु.नों.क्र. १२६/२००६ कलम ८(क) सह २१, २९ एन.डी.पी. एस.कायदा १९८५ (स्पेशल केस नं. ९२/०६)** |

—: “ **हेरॉईन या अंमली पदार्थाची विक्री** ’’:—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमुद गुन्हयात दिनांक २३/०५/२००६ रोजी मपोउपनि परब यांना त्यांच्या खास गुप्त बातमीदाराने विश्वसनीय खबर दिली की, १२.३० ते १३.३० वाजेच्या दरम्यान छत्रपती शिवजी टर्मीनल, मुख्य टपाल कार्यालय, येथे इसम संजीवा व फिरोज यांनी दिलेली गर्द पावडर महीला फातीमा शेख वय २० ते २५ वर्षे, ही सदरची गर्द पावडर त्यांच्या गिन्हाईकास विक्री करण्यासाठी वरील ठिकाणी येणार आहे.

त्याबाबत मपोउपनि परब यांनी नमुद घटनास्थळी पोलीस पथक व दोन पंचासह पाळत ठेवुन छापा घातला असता तेथे दोन महीला आरोपी तिच्या ताब्यातील ११० ग्रॅम गर्द पावडर हा अंमली पदार्थ बाळगलेल्या स्थितीत मिळुन आल्या म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. प्रसाद दशरथ पांढरे, वय—३४ वर्षे सपोनि/अंपविक, मुंबई |
| हस्तगत मालमत्ता | :— | ११० ग्रॅम गर्द पावडर हा अंमली पदार्थ |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १)फातीमा नागुरअली शेख, वय २० वर्षे ( दोषमुक्त )<br>२)फिरोज फजलु सय्यद उर्फ फिरोज चिकना वय १९ वर्षे (डिस्चार्ज)<br>३)सचिनम चंगय्या गुरुस्वामी उर्फ संजय उर्फ संजीवा शेटटी, वय ५२ वर्षे अटक दि.२३/०८/२०२२ रोजी |

**तपास कौशल्य :—** नमुद गुन्हयात अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांचेकडील एकुण १५ गुन्हयामध्ये आरोपी संजीवा शेटटी हा पाहीजे आरोपी होता. सदरचा आरोपी हा २००१ पासुन कुठल्याच गुन्हयात अटक झालेला नव्हता तसेच सदर आरोपी याचा फोटो सुध्दा अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांचे रेकॉर्डवर नव्हता.

सदर आरोपी याचा कक्ष कार्यालयाकडुन मागील दिड वर्षापासुन शोध चालु होता. आरोपीचा शोध घेणे अत्यंत कठीण झाले होते कारण आरोपीचे संजीवा हे नाव फक्त हे हेराईन हया अंमली पदार्थ विक्री करण्याचे धंदयामध्ये होते त्याचे खरे नाव कोणालाच माहीत नव्हते. सदर आरोपी याचा शोध घेण्यासाठी आरोपी याचेवर दाखल असलेल्या सर्व गुन्हयाचे रेकॉर्ड हे अंमली पदार्थ विरोधी कक्ष येथुन प्राप्त करण्यात आले. सदरच्या केसेस हया खुप जुन्या होवुन निकाली निघाल्याने सदर केसेची माहिति न्यायालयाकडुन प्राप्त करण्यात आली. व सदर गुन्हयामध्ये या आधी जे आरोपी अटक करण्यात आले होते त्यांचा शोध घेवुन त्यांना कक्ष कार्यालयामध्ये बोलावुन त्यांचे सविस्तर जबाब नोदवुन संजिवा शेटटी यांचे बाबत सखोल माहिती काढण्यात आली.

बांद्रा अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांचेकडील जामीनावर असलेल्या आरोपीतांना कक्ष कार्यालयात चौकशीला बोलावुन संजीवा शेटटी यांचे स्केच तयार करण्यात आले व सदरचे स्केच हे गोपनीय बातमीदार यांना देवुन त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. अथक प्रयत्नानंतर एका गोपनीय बातमीदाराने सदर स्केचवरुन सदरची व्यक्ती ही सचिनम गुरुस्वामी उर्फ संजीवा ही असावी अशी शंका आल्याने त्याबाबत तपास करुन एक मोबाईल नंबर प्राप्त केला. मोबाईल नंबरचा तांत्रीक विश्लेषन करण्यात आले.

परंतु सदरचा आरोपी हा फक्त व्हाटसअप कॉल वापरत असुन तो सोशल मिडीया वापरत नसल्याने त्याचा शोध घेणे अत्यंत क्लिष्ठ झाले होते. शेवटी दिड वर्षाचे प्रयत्नानंतर दि.२२/०८/२०२२ रोजी बोरीवली परिसरातुन एका संशयीतास ताब्यात घेवुन कक्ष कार्यालयात आणुन त्याचेकडे चौकशी केली असता त्याचे नाव सचिनम चंगय्या गुरुस्वामी उर्फ संजय उर्फ संजीवा शेटटी, वय ५२ वर्षे, असा असल्याचे निष्पन्न झाले

अशा रितीने गु.प्र.शा.गु.अ.वि. कक्ष—११ च्या पथकाने आरोपीचा फोटा किंवा खरे नांव कोणासही माहीत नसतांना दिड वर्ष अथक प्रयत्न करुन कोणताही दुवा नसताना चिकाटीने तांत्रीक कौशल्याचा अचुक वापर करून, आधुनिक व पारंपारिक तपासाचा अवलंब करीत, एकुण १५ गुन्हयातील पाहिजे आरोपीतास अटक करुन गंभीर स्वरुपाचे गुन्हे उघडकीस आणले आहेत

**गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष—११, गुन्हे शाखा, तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभारी पोलीस निरीक्षक | विनायक चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | मानसिंग पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | भरत घोणे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहा. पोलीस निरीक्षक | अभिजीत जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सहा. पोलीस निरीक्षक | विशाल पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोलीस उप निरीक्षक | अजित कानगुडे | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | सफौ ९७१४ | दिपक कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.ह.क्र २९२१० | सुधीर तरटे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.ह.क्र ३२७४० | चंद्रसेन गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ह.क्र ३४३८३ | गिरीश सुर्वे | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ह.क्र. ००—४८५ | जयेश केणी | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ना.क्र. ०३—३६० | सचिन खताते | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ना.क्र.०३३५२ | अजय कदम | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ना.क्र.००८५० | विक्रांत खांडेकर | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ना.क्र.०४०७५८ | महेश रावराणे | प्रशस्तीपत्रक |
| १६ | म.पो.ना.क्र.०४०२६५ | सारिका कदम | प्रशस्तीपत्रक |

# (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ऑगस्ट —२०२२

| ०२ | वर्सोवा पोलीस ठाणे, मुंबई परिमंडळ— ९ | गु.र.क्र ४५३/२०२२ कलम ३०२ भा.द.वि |
|---|---|---|

—:" **गंभीर दुखापत करुन खून** ":—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :** सदर गुन्हयात बळीत सुरज मनोज तिवारी, वय २४ वर्षे, व आरोपी मोनूकुमार शिवनारायण सिंग उर्फ लोटू, वय २० वर्षे, हे रोडसाईट राहणारे होते तसेच ते एकत्र नशा करत असत. दिनांक २४/०७/२०२२ रोजी गुन्हयातील बळीत व आरोपी हे , सात बंगला बस डेपोच्या आवारात, बस थांब्याच्या फलाट येथे एकत्र नशा करत असताना त्यांच्यात किरकोळ भांडण झाले. सदरवेळी आरोपी मोनूकुमार शिवनारायण सिंग उर्फ लोटू,यास राग अनावर होऊन त्याने जवळच पडलेला दगड बळीत सुरज मनोज तिवारी, याचे डोक्यात मारला. त्यामुळे गंभीर जखम होऊन त्याचा मृत्यु झाला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. विजय दिनकर भंडारे, वय— ५८ वर्षे, |
| बळीत व्यक्ती | :— | सुरज मनोज तिवारी, वय २४ वर्षे, |
| आरोपी अटक व दिनांक | :— | मोनूकुमार शिवनारायण सिंग उर्फ लोटू, वय २० वर्षे,<br>अटक दिनांक ०५/०८/२०२२ रोजी |

**तपास कौशल्य :—** सदर गुन्हा घडल्यानंतर वेगवेगळी तीन पोलीस पथके मयत अनोळखी इसमाचा शोध घेणेकामी तयार करण्यात आली. नमुद गुन्हयाच्या तपासादरम्यान मयत इसमाच्या नांव व पत्याबाबत कोणतीही माहिती प्राप्त नसताना तपासी पथकाने चौकशी करुन आजुबाजूच्या परिसरात फुटपाथवरती राहणाऱ्या इसमांकडून मयत इसमाचा नांव व पत्ता प्राप्त केला. बळीताचे नांव सुरज मनोज तिवारी, वय २४ वर्षे, असल्याचे समजले. परंतु त्याच्या मोबाईल क्रमांकाबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नव्हती. बळीताचे मामा परमेश्वर शुक्ला, यांच्याबाबत माहिती प्राप्त करुन त्यांच्याशी दुरध्वनीव्दारे संपर्क साधला व सुरज याचा खुन झाल्याचे सांगून त्यांना सुरज बाबत विचारणा केली असता मयत सुरज तिवारी हा नात्याने त्यांचा सख्खा भाचा असून, तो त्यांचेकडे रहावयास होता असे सांगितले.

गुन्हयातील बळीतांचा मोबाईल क्रमांक प्राप्त करुन शेवटच्या लोकेशनबाबत माहिती घेतील असता ते मस्जिद बंदर, मुंबई या परिसरात असल्याचे निष्पन्न झाले. तपासादरम्यान पाहिजे आरोपीचा मानवी कौशल्याद्वारे शोध घेण्यात आला. पथकाने अहोरात्र पाहिजे आरोपीबाबत मुंबई, नवी मुंबई, ठाणे, मिरा—भाईदंर वसई विरार या पोलीस आयुक्तालयाअंतर्गत मोठी माणसे हरविल्याच्या नोंदवहया तसेच अभिलेखावरील अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांची माहिती प्राप्त केली.

तपासादरम्यान पथकास मयत इसम याचा खून मोनू नावाच्या इसमाने केला असल्याची माहिती प्राप्त झाली. मोनू या नावाच्या आरोपीताबाबत सी.सी.टि.एन.एस प्रणाली, त्याचप्रमाणे अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या व्यक्तीबाबत तसेच सोशल मिडियाच्या सर्व साधनाच्या आधारे शोध घेतला असता पाहिजे आरोपी मोनू हा बोलताना शिवी देत असल्याचे तसेच त्याचे भाषेवरुन तो उत्तरेतील राज्यातील असावा या मतापर्यंत तपास पथक पोहचले. मानवी कौशल्याच्या आधारे पाहिजे आरोपी मोनू याचेबाबत अथक परिश्रम व सातत्यपुर्ण प्रयत्न करुन तसेच जवळपास १५० सी.सी.टि.व्ही कॅमेऱ्यांच्या सी.सी.टि.व्ही फुटेजची पाहणी करुन पाहिजे आरोपीचा फोटो प्राप्त करण्यात आला.

पाहिजे आरोपी मोनू याच्या प्राप्त फोटोच्या आधारे पुन्हा तपास पथकाने निरंतर व सचोटिने सलग १० ते १२ दिवस मुंबई, नवीमुंबई, ठाणे, मिरा—भाईदंर वसई विरार या पोलीस आयुक्तालय अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या व्यक्तींकडे केलेल्या तपासात आरोपी मोनू हा जोगेश्वरी पुर्व परिसरात काही व ापुर्वी अंमली पदार्थाची विक्री करणा—या एका व्यक्तीकडे काम करत असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या गुप्त माहितीच्या अनुषंगाने तपासी पथकाने सलग पाच ते सहा तास रामटेकडी, जोगेश्वरी (पुर्व), मुंबई याठिकाणी सापळा लावून पाहिजे आरोपी यास शिताफीने ताब्यात घेवून पोलीस ठाणेस आणले व याच्याकडे विश्वासात घेवून कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली. गुन्हा करताना परिधान केलेले कपडे, चोरलेला मोबाईल, व इतंर मुददेमाल हस्तगत करण्यात आला.

तपासी पोलीस पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीबाबत कोणतेही धागेदोर नसताना तसेच कोणतीही तांत्रिक माहिती उपलब्ध नसताना सातत्यपुर्वक, कौशल्यपुर्ण, अथक मेहनत आणि सचोटिने तपास करून गंभीर गुन्हा उघडकीस आणण्यात यश प्राप्त केले आहे. त्यामुळे जनमानसात बृहन्मुंबई पोलीस दलाची प्रतीमा सुधारण्यामध्ये मोलाची कामगिरी बजावली आहे.

**वर्सोवा पोलीस ठाणे, तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | सहा.पोलीस आयुक्त | श्रीमती ज्योत्स्ना रासम | प्रशस्तीपत्रक |
| २ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | सिराज इनामदार, | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस निरीक्षक | करण सोनकवडे, | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोलीस निरीक्षक | संग्रामसिंह पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| ५ | सहा. पोलीस निरीक्षक | विवेक खवळे, | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पोलीस उप निरीक्षक | नागेश मिसाळ, | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पोलीस उप निरीक्षक | सुनिल वाघ | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पो.ह.क्र ९६१६४२ | अंकुश गवळी, | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो.ह.क्र ९८०२५१ | मयुर शिर्के, | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ना.क्र ०५०२६४ | पांडुरंग पवार, | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.शि.क्र ०८००८९ | तुषार भोसले, | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.शि.क्र ०९०५२७ | देविदास साबळे, | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.शि.क्र ०९०७६९ | अभिनव रकटे, | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.शि.क्र ०९२०२० | निलेश किंजळकर, | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.शि.क्र ११०१३९ | विशाल थोरात, | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.शि.क्र १११७३६ | सागर अवघडे, | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.शि.क्र ११३१९ | अमोल घाडगे | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ना.क्र ०६१६२ | गणेश हन्संनाळे | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :—**

दिनांक १३/१०/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या '' **BEST CONVICTION OF THE MONTH** " माहे ऑगस्ट—२०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ऑगस्ट — २०२२

| | | |
|---|---|---|
| **०१** | **दहिसर पोलीस ठाणे, मुंबई परिमंडळ—१२** | **गु.र.क्र. ४४२/२०१६ कलम ३७०(अ) (१), ३४ भादवि सह ४,५ पीटा. ॲक्ट १९५६ सह ४,८ सह १७ पोक्सो अधिनियम,** |

—: **''अल्पवयीन बळीत मुलींना वेश्या व्यवसायास प्रवृत करणे'':—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात आरोपी मजनुअली रबीउल सरदार, वय २८ वर्षे याने अल्पवयीन बळीत मुलीस वेश्या व्यवसासास अन्य ठिकाणाहून मिळविणे व तिला वेश्या व्यवसायाकरीता प्रेरणा देवून प्रवृत्त केले. तसेच गिऱ्हाईकास वेश्यागमना करीता पुरवून स्वताच्या उपजिविकेसाठी मोबदला स्विकारला म्हणुन गुन्हा दाखल.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. मनोहर प्रेमजी वाघेला, ४७ वर्षे, (एन.जी.ओ) |
| निकाल दिनांक | :— | दि.०५/०८/२०२२ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | मजनुअली रबीउल सरदार, वय २८ वर्षे<br>आरोपी अटक दिनांक .२६/११/२०१६ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | सदर गुन्हयात मा. सत्र न्यायधिश सो।, कोर्ट रूम न. ९ यांनी आरोपीतास द ठरवून कलम ३७० भादविस अंतर्गत ५ वर्षे सक्त मजुरी व कलम ४, ५ अंतर्गत ५ वर्षे सक्त मजुरी तसेच पोक्सो अंतर्गत २ वर्षे सक्त मजुरी व स २००/— दंड, दंड न भल्यास २ दिवस सजा अशी शिक्षा सुनावली आहे. |

**तपास कौशल्य** :— नमुद गुन्हयात नोंद झाल्यानतंर आरोपीतास अटक करण्यात आली आहे. आरोपीतास दोषसिध्दी व शिक्षा मिळावी याकरिता तपासी अधिकारी व पथकाने गुन्हयाचे गांभीर्य ओळखून वस्तूजन्य पुरावे हस्तगत केले. तसेच जास्तीत जास्त साक्षीदार जबाब नोंद करण्यात आले, आवश्यक ते सर्व पुरावे मिळवून विहीत वेळेत आरोपीतांविरूध्द दोषारोप पत्र मा. न्यायालयात सादर करण्यात आले.

न्यायालयीन प्रक्रिया चालू असताना प्रत्येक सुनावणीच्यावेळी साक्षीदार व पंच यांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक गुन्हे व पैरवी अधिकारी यांनी मार्गदर्शन केले व मा. न्यायालयासमक्ष सकारात्मक साक्ष देण्यास प्रोत्साहीत केले. तसेच वेळोवेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक गुन्हे, पैरवी अधिकारी यांनी पोलीस निरीक्षक गुन्हे लेखनिक, कोर्ट कारकून, समन्स वॉरंट बजावणी करणारे अंमलदार यांच्या मदतीने अशा प्रकारचे निच कृत्य करणाऱ्या आरोपीतांस जास्तीत जास्त शिक्षा होण्याकरीता साक्षीदार यांना विश्वासात घेवून, ते सकारात्मक साक्ष देतील. याकरीता सर्वतोपरी प्रयत्न केले. तसेच सर्व साक्षीपुरावे मा. न्यायालयाच्या पुढे सादर केले, जेणेकरून आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा होईल, याची दक्षता घेतली.

सदर गुन्हयामध्ये तपासी अधिकारी, त्यांना मदत करणारे मदतनीस, कोर्ट कारकुन व पोलीस अंमलदार यांनी आपल्या लौकीकास साजेशी कामगीरी करून आपले गुन्हे अपराध सिध्दीचे कौशल्य सिध्द केले आहे व जनमानसात मुंबई पोलीस दलाची प्रतीमा उज्वल केली आहे.

दहिसर पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | प्रविण पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | संजय बांगर | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | संजिव तावडे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक | कमलेशमणी रामकृपाल पांडे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह. २९७७७ | चंद्रकांत दशरथ कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ह. ९६०२५४ | नरेंद्र चंद्रकांत सकपाळ | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पोनाक्र. ०३११९२ | रविंद्र वासुदेव पोळ | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| ०८ | पो.ना.क्र.०४०८७५ | अमित दत्ताराम पटकुरे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.ना.क्र.०६०६०९ | वैभव शिवाजी चिकणे | प्रशस्तीपत्रक |
| १० | मपोशिक्र.०८१६०९ | प्रगती पंडीत सातपुते | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पोशिक्र. ११०१४० | नरसिंग काशिनाथ विटकर | प्रशस्तीपत्रक |